# प्रास्ताविक

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरए-1066-डी 1, दिनांक 01 एप्रिल 1968 अन्वये पंचायती राज संस्थांच्या लेख्यांच्या परीक्षणाबाबत 1967-68 या वर्षाचा पहिला अहवाल माहे ऑक्टोबर 1971 मध्ये ग्रामविकास विभागामार्फत विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आला व त्यानंतर प्रत्येक वर्षाचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल सादर करण्यात येतो.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 व महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम 1931, संबंधित संस्थांचे नियम / अधिनियम तसेच वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय/आदेश/परिपत्रके यांच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण करण्यात येते.

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी तयार केलेला सन 2021-2022 या वर्षाचा हा एकावन्नावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल आहे. राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था जसे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांचे सन 2021-2022 चे लेखापरीक्षण पूर्ण झाले असून, त्यांचे लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करण्यात आले आहेत. सदर लेखापरीक्षण अहवालातील काही महत्वाच्या बाबींवरील परिच्छेद या पुनर्विलोकन अहवालात अंतर्भूत केले आहेत.

लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालामधील प्रकरण 1 व 2 मध्ये सांख्यिकी माहिती, प्रकरण 3 मध्ये जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांचे परिच्छेद, प्रकरण 4 मध्ये पंचायत समितीचे परिच्छेद आणि प्रकरण 5 मध्ये ग्रामपंचायतींच्या परिच्छेदांचा समावेश आहे. लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये अंतर्भूत केलेल्या प्रत्येक परिच्छेदात संबंधित जिल्हा परिषद, त्यांचे विभाग, पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या नावांचा उल्लेख केला असून संबंधित संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालातील मूळ परिच्छेदांचे क्रमांक कंसामध्ये नमूद केले आहे. सार्वत्रिकपणे व वारंवार आढळणाऱ्या त्रुटी/अनियमितता दर्शविणारे परिच्छेद तक्तांकनाच्या स्वरुपात तर विषयानुरुप स्वतंत्रपणे नमूद परिच्छेद मसुदीकरणाच्या स्वरुपात अहवालात दर्शविण्यात आले आहेत.

या अहवालात समाविष्ट केलेल्या परिच्छेदांच्या अनुपालनासाठी/ उत्तरासाठी व अद्ययावत माहिती देण्यासाठी संबंधित जिल्हा परिषद, पंचायत समिती यांना कळविण्यात आले होते. त्यासंबंधी खुलासा/अनुपालन सादर करण्यासाठी पुरेसा कालावधी ही देण्यात आला होता. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी दिलेली अनुपालने / उत्तरे विचारात घेतल्यानंतर परिच्छेदांची निवड करुन लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार करण्यात आला आहे.

अहवाल वाचन सुलभ होण्यासाठी अहवालाच्या शेवटी जिल्हा परिषद निहाय परिच्छेदांची निर्देश सूची देण्यात आली आहे.

(निलेश राजुरकर)
संचालक
संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य